# श्रीलिपी'; तरूणांच्या उपेक्षेचे वास्तव चित्रण

ज्योती बापुराव गरबडे संशोधक विद्यार्थीनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**प्रस्तावना:** आज मानवी जीवन झपाटयाने बदलत आहे. आधुनिक अवजारे, वीज, यंत्रे यामुळे कमी कष्टात जास्त आणि दर्जेदार कामे होत आहेत. अनेक कुटुंबातील शिक्षितांना निरनिराळया क्षेत्रात नोकऱ्या मिळाल्या आहेत. कल्याणकारी धोरणामुळे रोजगारहमी, जवाहर योजना, इंदिरा आवास योजना आणि अनेक प्रकारच्या अनुदान योजना यांचा काही प्रमाणात जनतेला लाभ झालेला आहे. तरीही पुढारी—अधिकारी यांच्या सलगीने चालणारा भ्रष्टाचार, लोकांमध्ये जाग्रतीचा अभाव, असंघटीतपणा, आर्थिक दुर्बलता आणि परावलंबित्व यामुळे फार मोठा ग्रामीण समाज या लाभांपासून खूप दूर आहे. या सर्व अनुकूल—प्रतिकूल बदलांचा परिणाम ग्रामीण माणसांवर होत आहे. वैफल्य, निराशा, लाचारी वाढत आहे. विफल शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तसेच विद्रोह, कलह निर्माण होत आहेत. ही बदलती मानसिकता अनेक लेखकांनी आपल्या साहित्यात प्रतिबिंबित केली आहे.

समकालाला कवेत घेऊन या दशकाच्या गतीला, प्रश्नांना, आजाराला थेट भिडणारी कथा किरण गुरव यांनी लिहिली आहे. त्यांच्या 'श्रीलिपी' या कथासंग्रहामध्ये त्यांनी खेडयापाडयात घुसलेल्या नव्या व॰त्ती—प्रव॰त्ती, राजकारणाने घेतलेले नवे वळण, गावाचे ढासळतेपण, तरूणांची बदललेली मानसिकता, एकूणच जगण्यातील गुंतागुंत, नात्यात निर्माण झालेले अभाव, जातीच्या अहंकाराने तीक्ष्ण झालेले कंगोरे अशा अनेक समकालिन प्रश्नांना वाचा फोडली आहे.

समकालीन लेखकामध्ये कथालेखन करणारा सर्व व्यथा वेदनासह जाणीवेच्या पातळीवर मांडणी करणारा, अनेक भावकंगोरे अभिव्यक्त करूण वाचकाला अंतर्मुख बनविणारा या दशकातील तरूण लेखक म्हणजे किरण गुरव होय. त्यांनी आपल्या कथासंग्रहामध्ये ग्रामीण परिसरातील अनेक समस्या मांडल्या आहेत. या कथांमध्ये परंपरेला छेद न देता नवतेचा स्वीकार करणे आणि नवतेचा स्विकार करताना मुळातला माणूस हरवू न देता त्याला ताठ मानेने उभा करण्याचे सामर्थ्य त्याच्यात येणे या अंगाणे त्यांनी कथेचा आशय, विषय यांची माडणी केली आहे. तसेच ग्रामीण जीवनातील माती, नाती, आणि नीती यांची मूल्ययुक्त नाळ आपल्या कथांमधून गुंफली आहे. सामाजिक बांधिलकी मानून समाज प्रबोधनाचा वसा ते चालवतात. त्यामुळे खेडयातील माणसांच्या व्यथा, वेदना आणि दु:ख याचे वास्तव पातळीवर चित्रण केले आहे.

या संग्रहातील कथालेखनाचा परिघ कोल्हापूर परिसर व राधानगरीच्या आसपासचा परिसर असल्याने सर्व कथा या परिसराभोवती घडत असल्याचे दिसुन येते. संख्यात्मकद॰ष्टया  गुरव यांच्या कथा अधिक नसल्या तरी गुनात्मकद॰ष्टया त्या चांगल्या प्रतिच्या निश्चित आहे. त्यांची प्रत्येक कथा वैशिष्यपूर्ण आणि त्यांच्या लेखन म्हणून भूमिकेच्या वेगवेगळया पैलू दाखवणाऱ्या आहेत.'श्रीलिपी' या कथेत तंत्रज्ञानाचे महत्व सांगून जुन्या व नवीन पिढीतील संघर्षाचे चित्रण रेखाटले आहे. आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचे ज्ञान अवगत असणे ही काळाची गरज आहे. पण जुनी पिढी ही परंपरावादी असल्याने नवीन तंत्रज्ञान त्यांना समाजजीवनाच्या विकृतीचे लक्षण वाटते. त्यामुळे आपल्या नवीन पिढीनेही आपली परंपरा जोपासली पाहिजे असे वाटते. पण आजचे तरूण त्याला न जुमानता या आधुनिक युगावर स्वार होण्यास निघाला आहे. या कथेत मुलगा आणि बाप यांच्यामध्ये एक प्रकारचे तणावग्रस्त वतावरण आहे. दोन पिढयांतील अंतर, त्यांच्यातील विसंवाद, माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे मानवी संबंधार झालेल्या परिणामाचे वास्तव मांडले आहे.

'वडाप' या कथेमधून बेरोजगार तरूणांचा प्रश्न मांडला आहे. आज असंख्य तरूण मुले शिक्षण घेतात. शिक्षण घेवूनही नोकरी न मिळाल्याने सुशिक्षित बेकार असा शिक्का मिरवत त्यांना हिंडावे लागते. पण यातील काही तरूण आपल्या उदरनिर्वाहासाठी स्वयंरोजगाराकडे वळतात. कर्ज प्रकरण करूण उद्योगधंदा चालवण्याचा प्रयत्न करतात. या कथेतील नायक आंदू कर्जप्रकरण करून प्रवासी वाहतूक करण्यासाठी जीप घेतो. पण हा व्यवसाय करतानाही त्याला असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. आर.टी.ओ.ची अचानक पडणारी धाड. एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांचा दबाव. बॅक प्रकरणांमुळे हप्त्यांचा तगादा, यामुळे या व्यवसाय करणाऱ्या तरूणांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. यातून तो व्यसनाच्या आहारी जातो आणि आपले कौटुंबिक स्वास्थ्य हरवून बसतो. नातेवाईकांचा रोष ओढावून घेतो.

'क्लॉक अवर बेसिस' या कथेमध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांचा आर्थिक व सामाजिक प्रश्न येतो. आज अनेक तरूण आहेत की ज्यांचे शिक्षण पूर्ण झालेले आहे पण नोकरी नाही. नोकरीसाठी वनवन भटकावे लागते. शिक्षकाची नोकरी मिळालीच तर कधीतरी परमनंट होऊ या आशेवर कितीतरी वर्ष तासिका तत्वावर , कमी पगारात काम करतो. पण त्यांच्याकडे कोणाचेच लक्ष जात नाही. त्यामुळे समाजात व कुटुंबात वावरताना त्यांना अनेक प्रकारचा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे हे भिषण वास्तव आहे. कथेतील जयकर सर अशा प्रकारच्या व्यवस्थेमध्ये अडकल्याचे दिसून येते. नोकरदार मुलगा आहे म्हणून त्याला मुलगी दिली जाते. पण वास्तविक तो तासिका तत्वावर काम करतो. त्यावेळी तत्नीच्या, कुटुंबाच्या गरजा भागवू न शकल्यामुळे त्याच्या ठिकाणी एक प्रकारचा मानसिक ताण निर्माण होतो, तर दुसरीकडे परमनंट नोकरी मिळविण्यासाठी ज्या जागा रिकाम्या आहेत त्या जागेसाठी अर्ज करूण प्रसंगी डोनेशन भरूणही त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. याचा मानसिक त्रास होतो. त्यामुळे त्यांचे जीवन अधांतरी असल्यासारखे होते. जयकर सरांचा सहकारी बज्याला तर या गोष्टीचा इतका मानसिक धक्का बसतो की त्याला ह्दयविकाराचा झटका येतो. आजच्या तरूणाचे नोकरी मिळविण्यासाठी चाललेली धडपड व त्यामध्ये त्याला आलेले अपयश आणि त्यातून त्यांची बदलत जाणारी मानसिमता दिसून येते.

'शायनर' या कथेत शाळेच्या नावाखाली उनाडक्या करत फिरणाऱ्या सुरेश पंगारे या तरूण मुलाचे भावविश्व रेखाटले आहे. आजच्या तरूणांची मानसिकता कशी बदलत चालली आहे. याचे वास्तव म्हणजे सुरेश, एकीकडे नोकरीसाठी वनवन फिरणारा तरूण. तर दुसरीकडे आई—वडिलांच्या जीवावर उनाडक्या करत फिरणारा, त्यांना अंधाराम ठेऊन  वाईट काम करणारा, घरची, समाजातील परिस्थितीची जाण नसलेला, दुसऱ्यावर अवलंबून असणारा, स्वत:च्याच भावविश्वात रममाण होणारा, स्वछंदी राहणारा तरूण रेखाटला आहे.

'डिजिटल म॰गजळाचा प्रवास' ही कथा सुशिक्षित बेकारीच्या प्रश्नवर आधारलेली आहे. महाराष्ट्र श्शासन अनेक प्रकारच्या योजना जाहिर करते. याचे कारण म्हणजे गरीब जनतेला आर्थिक पाठबळ मिळावे, त्यांचा रोजगार विस्तार व्हावा यासाठी कमी व्याजदरामध्ये भांडवल पुरवले जाते. उजाडलेलं घरटं सावरण्याची संधी तरूणांना दिली जाते. पण या तरूणांच्या भोळेपणाचा अनेक एजंट फायदा घेतात. म॰गजळासारखे अमिष दाखवून त्यांच्याकडून भरमसाठ पैसा अकळला जातो. व शेवटी वेळ येताच जबाबदारी झटकून दिली जाते. जगू हा सामन्य घरातील सुशिक्षित तरूण. तो डिजिटल कॅमेरा व कॉम्प्युटर घेण्याच्या आशेने बाबू पाटलाच्या मदतीनं एक लाखाचे कर्ज प्रकरण करतो. त्यासाठी खूप त्रास सहन करावा लागतो. कोल्हापूरसारख्या शहरात त्याच्या खूप चकरा होतात. पण नगरकर, श्रीखंडे हे दलाल त्याला दर वेळेस नवीन चुका काढून परत पाठवितात. मग पुन्हा त्याच्या तयारीना लागतो. खुप दिवस झाले तरी प्रकरण मंजूर होण्याची काहीच चिन्हे दिसत नाहीत तेंव्हा तो अस्वस्थ होतो. त्याची आई सरकारी कामाविषयी म्हणते, ''हे सरकारी काम हाय लोका. सरकारी काम नी सा म्हयने थांब म्हंत्यात ते काय उगंच व्हय?''

पण एक दिवस आपल्या भावकीतल्याच एकाने डिजिटल फोटो स्टुडिओ काढला आणि त्याचे उद्घाटन आहे असे समजताच जगूच्या पायाखालची माती सरकते. त्याला अतिशय दुःख होते. समाजकल्याण ऑफीसमधील सरकारी अधिकारी बारटक्के त्याला पुन्हा कर्ज प्रकरण करण्यासाठी सहा हजार रूपये मागतो. तेव्हा जगूचे अवसानच गळून जाते. सरकारी योजनेचे अमिष दाखवून मधले एजंट एका तरूणाला फसवून त्याचे जीवन कसे बरबाद करतात हे यामधून दिसून येते.

किरण गुरव यांच्या कथेतून विविध प्रकारचे जाणीवविश्व निर्माण झाले आहे. तंत्रज्ञान प्रभावित भांडवली रचनेची समाजव्यवस्था आकाराला येत आहे. त्यातून नवे वास्तव रचले जात आहे. जुन्या पिढीतील लोकांची अवस्था या काळात अधांतरी स्वरूपाची होत आहे. एकप्रकारचे दिशाहीन भांबावलेण समाजाला आलेले आहे. या जाणिवेचे सुचन करणारा 'श्रीलीपी' हा कथासंग्रह आहे. दोन पिढयातील अंतर, विसंवाद आणि काळाच्या गतीशीलतेने मानवी संबंधावर झालेले परिणाम ती तीव्रपणाने मांडते. तरूणांची घुसमट तिच्या कोलाकलासह साकार झालेली आहे. लोकशाहीच्या प्रक्रियेतून गावपातळीवर समाजगटांचे झालेले ध्रूवीकरण व तीव्र स्वरूपाच्या सत्तास्पर्धेमुळे परंपरागत समूहमनावर उमटलेले ओरखडे यांचे चित्रण या कथासंग्रहात येते.

गुरव यांचे कथारूपही वैशिष्टयपूर्ण आहे. कथनरूपाचे स्वतंत्र भान या कथेला आहे. त्यांच्या कथा या दीर्घकथा स्वरूपाच्या आहेत. वर्णन, निवेदन, संवाद, बोलीभाषा व प्रादेशिक मांडणी फार कल्पकतेने केलेली आहे. राधारगरी बोलीचा व संस्कृतीचा वावर त्यामध्ये आहे. प्रतिमाप्रतिके, रूपकांची खचाखच भरलेली वर्णने त्यात आहेत. खास अशी प्रादेशिक, लिंगभाषेची वेगळी भाषारूप त्यामध्ये आहेत. काव्यात्म, गद्य निवेदनाच्या फार चांगल्या छटा त्यात आहेत. वाचक सतत दक्ष राहिला पाहिजे याचे भान आणि त॰तीयपुरूषी निवेदनाचा कल्पक वापर या निवेदनात आहे. गुरव यांच्या कथालेखनाची शैली ही समूहसंस्कृतीचा सजीव अवकाश, लोकपरंपरेने रचलेली सांस्कृतिक कृतीच्या वाचन व्यासंगातून घडविलेली आहे.

एकंदरीत समकालिन कथालेकांमध्ये व्यथा वेदनेसह वाचक मनाला विचार करावयास लावणाऱ्या त्यांच्या कथा आहेत. ग्रामीण मराठी कथालेखनात किरण गुरव यांचे मोठे योगदान आहे. परंपरेला छेद न देता नवतेचा स्वीकार करत त्यांच्या कथा या आकार घेत आहेत. आशय–विषय आणि अभिव्यक्ती या अंगाने त्यांच्या कथा या सामर्थ्यवान आहेत.:

**संदर्भग्रंथ–**

१ गवस राजन – 'भाऊ पाध्ये यांची कथा' दर्या प्रकाशन, पुणे. २००९
२ गुरव किरण –'श्रीलिपी' श्शब्द पब्लिकेशन, मुंबई. २०१२
३ 'जोशी सुधा –'कथाः संकल्पना आणि समीक्षा' मुंबई. २०००
४ 'शेवडे इंदूमती –'मराठी कथाः उद्गम आणि विकास' सोमया प्रकाशन, मुंबई. १९७३
५ शिंदे रणधीर – 'मुक्तीचा तेवढाच एक मार्ग आहे' साधना जानेवारी २०१५
६ जोशी संजय भास्कर – 'राखीव सावल्यांचा खेळ', रूममध्ये आलं की लाइफ सुरू होत. ललित ऑगस्ट २०१२